दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

### आजचे पंचांग

दिनांक : १० जुलै २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : दशमी तिथी (सकाळी ०८:१६ पर्यंत) त्यानंतर एकादशी तिथी नक्षत्र : भरणी नक्षत्र (दुपारी ०१:१४ पर्यंत) त्यानंतर कृत्तिका नक्षत्र योग : धृति योग (सकाळी ०७:१४ पर्यंत) त्यानंतर शूल योग करण : विस्ती भद्रा करण

### राखीव प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सक्तीचे

**पुणे :** अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गाच्या राखीव जागांवर बोगस जात वैधता प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश घेतलेल्या ३२ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आले असून, या प्रकरणी दोन सहाय्यक प्राध्यापकांसह ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आतापर्यंत ९ आरोपींना अटक करण्यात आली असून दोन जण फरार आहेत. चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधिमंडळात उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी ही माहिती दिली.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक -२८३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### सत्तेला प्रश्न विचारणे म्हणजे महाराष्ट्राचा अपमान नव्हे'; राज ठाकरेंची सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर बोचरी टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे राज्याचा किंवा देशाचा अपमान होत नाही, असे ठाम प्रतिपादन करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांच्या टीकाविषयक भूमिकेवर जोरदार निशाणा साधला. विकासकामांतील त्रुटी, सार्वजनिक प्रकल्पांमधील विलंब किंवा कथित अनियमिततेबाबत नागरिकांनी प्रश्न विचारणे हे लोकशाहीचे मूलभूत वैशिष्ट्य असून, अशा प्रत्येक टीकेला राजकीय किंवा राज्यविरोधी ठरविण्याची प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक असल्याचे त्यांनी म्हटले.

महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे यांनी राम मंदिरातील कथित आर्थिक अनियमिततेच्या आरोपांचाही उल्लेख केला. श्रद्धा आणि आर्थिक पारदर्शकता या दोन वेगळ्या बाबी असल्याचे सांगत, सार्वजनिक देणग्या किंवा सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न विचारणे हे कोणत्याही धर्माचा अथवा राज्याचा अपमान ठरत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सोशल मीडियाच्या माध्यमातून विरोधकांविरोधात अपमानास्पद वातावरण निर्माण करण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला. सत्तेवर असलेल्या कोणत्याही व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा अधिकार नागरिकांना आहे आणि त्या अधिकाराला देशविरोध किंवा महाराष्ट्रविरोधाचे स्वरूप देणे ही लोकशाहीच्या मूल्यांशी विसंगत भूमिका असल्याची टीकाही त्यांनी केली.

# समान नागरी कायद्याच्या दिशेने महाराष्ट्राची झेप की राजकीय अजेंडा?

## सहा महिन्यांच्या मुदतीत समिती, हिवाळी अधिवेशनात विधेयकाचा सरकारचा संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रात समान नागरी कायदा (युनिफॉर्म सिव्हिल कोड) लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने औपचारिक हालचाल सुरू करत सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय तज्ज्ञ समितीची स्थापना जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ही घोषणा करत समितीला सहा महिन्यांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याची मुदत दिल्याचे सांगितले. या अहवालाच्या आधारे नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचे विधेयक मांडण्याचा सरकारचा मानस असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, या निर्णयामुळे केवळ कायदेशीरच नव्हे तर सामाजिक, धार्मिक आणि राजकीय पातळीवर व्यापक चर्चा आणि वादाला तोंड फुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्य सरकारने २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी तज्ज्ञ समिती गठित करण्याची घोषणा केली होती. त्या घोषणेची अंमलबजावणी म्हणून ही समिती स्थापन करण्यात आली असली, तरी या प्रक्रियेची वेळ आणि तिचे राजकीय परिणाम याविषयी प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. राज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वातावरण तयार होत असताना समान नागरी कायद्याचा मुद्दा पुन्हा केंद्रस्थानी आणण्यामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप विरोधकांकडून होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

समितीत न्यायव्यवस्था, प्रशासन, विधी, संविधान अभ्यास आणि सामाजिक क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, माजी न्यायमूर्ती एस. जी. मेहरे, माजी मुख्य सचिव डी. के. जैन, महाधिवक्ता ॲड. बिरेंद्र सराफ, संविधान अभ्यासक रमेश पतंगे आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुवर्णा रावल यांचा समितीत समावेश आहे. सरकारच्या मते विविध क्षेत्रांतील अनुभवामुळे समितीचा अहवाल सर्वसमावेशक आणि व्यावहारिक ठरेल. तथापि, समितीतील सदस्यांची निवड, त्यांच्या वैचारिक पार्श्वभूमीचा संभाव्य प्रभाव आणि विविध धार्मिक समुदायांचे प्रतिनिधित्व यावरही प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे.

समान नागरी कायद्याचा मूलभूत उद्देश विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसा, पोटगी आणि कौटुंबिक हक्क यांसारख्या वैयक्तिक कायद्यांमध्ये धर्मनिरपेक्ष आणि एकसमान कायदेशीर चौकट निर्माण करणे हा आहे. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांतील कलम ४४ मध्ये राज्याने समान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मात्र हे मार्गदर्शक तत्त्व न्यायालयीन अंमलबजावणीस पात्र नसल्याने त्याची अंमलबजावणी पूर्णतः सरकारच्या धोरणात्मक आणि राजकीय इच्छाशक्तीवर अवलंबून राहते.

देशात गोवा हे समान नागरी कायद्याची अंमलबजावणी असलेले एकमेव राज्य मानले जाते. मात्र, गोव्यातील कायदेशीर व्यवस्था ऐतिहासिक आणि पोर्तुगीज नागरी संहितेच्या वारशातून विकसित झालेली असल्याने ती इतर राज्यांमध्ये जशीच्या तशी लागू करणे व्यवहार्य ठरेल का, हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. महाराष्ट्रासारख्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेने नटलेल्या राज्यात समान नागरी कायद्याची अंमलबजावणी करताना घटनात्मक अधिकार, अल्पसंख्याकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचा प्रश्न, सामाजिक स्वीकार्यता आणि कायदेशीर गुंतागुंत यांचा सखोल विचार करावा लागणार आहे.

राज्य सरकारने समितीला सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याची मुदत दिली असली, तरी इतक्या व्यापक आणि संवेदनशील विषयाचा सर्वांगीण अभ्यास, विविध समाजघटकांशी सल्लामसलत आणि संभाव्य कायदेशीर परिणामांचे मूल्यमापन या सर्व प्रक्रिया अल्पावधीत पूर्ण होऊ शकतील का, याबाबत तज्ज्ञांमध्येही साशंकता व्यक्त केली जात आहे. परिणामी, समान नागरी कायद्याच्या दिशेने महाराष्ट्राने टाकलेले हे पाऊल केवळ घटनात्मक बांधिलकीची पूर्तता ठरणार की व्यापक राजकीय रणनीतीचा भाग, यावर येत्या काही महिन्यांत राज्यातील राजकीय आणि सामाजिक चर्चेचे केंद्रबिंदू निश्चित होणार आहेत.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना : बचाव मोहिमेत ९ जणांना जीवदान; शोधकार्यात सापडलेल्या भावेश वाणी यांचा मृत्यू

### एनडीआरएफ, सेना, अग्निशमन दल आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाची रात्रभर धडपड; २३ जण अडकल्याची प्राथमिक माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मोशी येथील कचरा डेपोतील प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा प्रचंड ढीग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर सुरू असलेल्या बचाव मोहिमेत ९ नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. मात्र, गुरुवारी सकाळी शोधकार्यात गंभीर अवस्थेत बाहेर काढण्यात आलेल्या भावेश वाणी यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची माहिती पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी दिली.

८ जुलै रोजी दुपारी सुमारे दीडच्या सुमारास मोशी कचरा डेपो येथील प्रशासकीय इमारतीवर कचऱ्याचा मोठा भाग कोसळला. या दुर्घटनेत इमारतीमध्ये अंदाजे २३ नागरिक अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. घटनेनंतर प्रशासनाची यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाली. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), भारतीय सेना, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अग्निशमन दल, पीएमआरडीए अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने रात्रभर युद्धपातळीवर बचावकार्य राबविले.



दुर्घटना घडल्यानंतर सुरुवातीला अशोक गुप्ता, मुनेंद्र कुमार, चंद्रशेखर सिंह, दिनेश सुतार आणि श्री बाला या पाच नागरिकांनी स्वतःची सुटका करून घेतली. त्यानंतर बचाव पथकाने ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध सुरू केला.

रात्री आठ वाजेपर्यंत बचाव पथकाने सोमनाथ शेळके, सचिन दवडगाव, दादासाहेब आरडे, सुजाता शिंदे, रामप्रताप चव्हाण आणि रणवीर सिंह या सहा नागरिकांना सुखरूप बाहेर काढले. त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले.

यानंतरही ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांसाठी शोधमोहीम सुरूच ठेवण्यात आली. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या बचावकार्यात विजय सपकाळ, भूषण पाटील आणि महेश राऊत या आणखी तीन नागरिकांना बाहेर काढण्यात आले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले.

#### मोशी कचरा डेपो दुर्घटनेची एसआयटीमार्फत चौकशी करा; दोषींवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : सुलभा उबाळे

**जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची खासदार श्रीरंग बारणे यांची मागणी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी कचरा डेपो येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे. या प्रकरणात सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाले असल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचे तीन वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले होते. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या प्रकल्पातील कार्यालयीन इमारत, सुरक्षा व्यवस्था आणि इतर कामे नियमानुसार झाली आहेत का, याची चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. गुरुवारी खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, ज्येष्ठ नगरसेविका सुलभा उबाळे आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी माध्यमांशी बोलताना बारणे म्हणाले, ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. येथे काम करणारे कर्मचारी सामान्य कुटुंबातील आहेत.

गुरुवारी सकाळी सुमारे ९ वाजता बचाव पथकाला आणखी एक नागरिक गंभीर अवस्थेत आढळून आला. त्यांना तातडीने वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

दरम्यान, या दुर्घटनेनंतर कचरा डेपोतील सुरक्षितता व्यवस्था, कचऱ्याच्या ढिगांचे व्यवस्थापन, प्रशासकीय इमारतीची सुरक्षितता आणि संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. बचावकार्य पूर्ण झाल्यानंतर दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी प्रशासकीय पातळीवर चौकशी होण्याची शक्यता आहे.

## 'फडणवीस दिल्लीत, शिंदे पुन्हा मुख्यमंत्री?'; पृथ्वीराज चव्हाणांच्या दाव्याने राजकीय तर्कवितर्कांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राच्या सत्ताकारणात पुन्हा एकदा नेतृत्वबदलाच्या चर्चांना वेग आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्राच्या राजकारणात पाठवून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पुन्हा मुख्यमंत्रीपदाची धुरा सोपविण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. तथापि, या चर्चांना कोणताही अधिकृत आधार नसून त्या केवळ राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या तर्कवितर्कांवर आधारित असल्याचे स्पष्टीकरणही त्यांनी दिले.

बीबीसी मराठीला दिलेल्या मुलाखतीत चव्हाण यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संभाव्य फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सत्तासमीकरणांमध्ये बदल होण्याच्या शक्यतेचा उल्लेख केला. फडणवीस यांना दिल्लीत महत्त्वाची जबाबदारी देण्याबरोबरच शिंदे गटाचे भाजपमध्ये विलीनीकरण करून एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याची चर्चा ऐकिवात असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर शिंदे यांच्या कुटुंबीयांनाही केंद्रात प्रतिनिधित्व मिळू शकते, अशाही चर्चांचा त्यांनी उल्लेख केला. मात्र, या दाव्यांमागे कोणतेही अधिकृत संकेत नसल्याचे चव्हाण यांनी स्पष्टपणे नमूद केले. या केवळ राजकीय गप्पा, माध्यमांतील चर्चा आणि ऐकिव माहिती आहे; याबाबत मला अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही, असे सांगत त्यांनी आपल्या विधानाला मर्यादित स्वरूप दिले.

दरम्यान, अशा प्रकारच्या चर्चांमुळे महायुतीतील अंतर्गत सत्तासंतुलन, भाजप-शिवसेना (शिंदे गट) संबंध आणि आगामी राजकीय रणनीतीबाबत नव्याने प्रश्न उपस्थित झाले आहेत. अधिकृत पातळीवर कोणतीही पुष्टी नसताना अशा दाव्यांमुळे राजकीय वातावरण ढवळून निघत असले, तरी प्रत्यक्ष निर्णय केंद्रीय नेतृत्वाच्या भूमिकेवर आणि भविष्यातील राजकीय घडामोडींवर अवलंबून राहणार असल्याचे निरीक्षकांचे मत आहे.

## ज्ञानराधा ठेवीदारांना दिलासा देण्याच्या हालचालींना वेग; निधी परताव्यासाठी प्रशासनाला मुख्यमंत्र्यांचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या ठेवीदारांना त्यांची रक्कम शक्य तितक्या लवकर परत मिळावी, यासाठी आवश्यक प्रशासकीय आणि कायदेशीर प्रक्रिया गतीने राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित यंत्रणेला दिले आहेत. या प्रकरणाचा आढावा घेताना त्यांनी जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन करून लिलावाची प्रक्रिया अधिक परिणामकारक पद्धतीने राबविण्यावर भर दिला.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जप्त मालमत्तांचे व्यावसायिक संस्थेमार्फत नव्याने मूल्यांकन करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. यामुळे मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निश्चित होण्यास मदत होईल आणि लिलावातून अधिक महसूल प्राप्त झाल्यास ठेवीदारांच्या परताव्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण होऊ शकते, असा प्रशासनाचा अंदाज आहे. बैठकीत न्यायालयीन प्रक्रिया, मालमत्तांच्या विक्रीसाठी आवश्यक मंजुरी तसेच संबंधित प्रस्ताव तातडीने पूर्ण करण्याबाबतही चर्चा झाली. ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करत निधी परताव्याची प्रक्रिया कायदेशीर चौकटीत आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यावर सरकारने भर दिल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# 'शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर संशयाच्या भोवऱ्यात हाफकिन'

## देशाच्या सार्वजनिक आरोग्याचा विश्वास जपणाऱ्या संस्थेवर आर्थिक अनियमिततेचे आरोप, निष्पक्ष चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** देशातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या इतिहासात मोलाचे योगदान देणाऱ्या आणि शतकभरापासून लस, औषधे तसेच जैववैद्यकीय संशोधन क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या हाफकिन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशनवर विधानसभेत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी महामंडळातील कथित आर्थिक अनियमितता, प्रशासकीय मनमानी आणि करार प्रक्रियेतील संभाव्य गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित करत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशीची मागणी केली. विशेषतः पोलिओ लसीच्या वाहतुकीशी संबंधित कथित अनियमिततेचा उल्लेख करत त्यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

हाफकिन ही केवळ राज्य सरकारच्या मालकीची सार्वजनिक संस्था नसून भारतातील जैववैद्यकीय संशोधन आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा ऐतिहासिक आधारस्तंभ मानली जाते. संसर्गजन्य आजारांवरील संशोधन, विविध लसींचे उत्पादन, सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांना आवश्यक जैविक उत्पादने उपलब्ध करून देणे आणि राष्ट्रीय लसीकरण मोहिमांना पाठबळ देणे या क्षेत्रांत संस्थेचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. कोविड-१९ महामारीच्या काळातही हाफकिन पुन्हा राष्ट्रीय चर्चेत आली होती. त्यामुळे अशा संस्थेवर होणारे कोणतेही आरोप केवळ आर्थिक स्वरूपाचे न राहता सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील नागरिकांच्या विश्वासाशीही निगडित ठरतात.

विधानसभेतील अर्धा तासाच्या चर्चेदरम्यान जयंत पाटील यांनी भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (उअत्र) यांच्या निरीक्षणांचा उल्लेख करत महामंडळातील कथित आर्थिक गैरव्यवहारांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांच्या म्हणण्यानुसार, पोलिओ लसीच्या वाहतुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या एका खासगी कंपनीने नियमानुसार विमानमार्गे वाहतूक करण्याऐवजी कथितरीत्या रस्तेमार्गाचा वापर केला, मात्र त्यासाठी विमान वाहतुकीचे बिल सादर करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यांनी असा दावा केला की, हा प्रकार गंभीर स्वरूपाचा असून संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

जयंत पाटील यांनी पुढे असा आरोपही केला की, कथित अनियमिततेनंतरही संबंधित कंपनीवर फौजदारी कारवाई झाल्याचे दिसून येत नाही आणि उलट तिला पुढील कामकाजातही संधी देण्यात आल्याचा प्रश्न उपस्थित होतो. सार्वजनिक निधीचा वापर, निविदा प्रक्रिया आणि करार व्यवस्थापनातील पारदर्शकतेबाबत गंभीर शंका निर्माण होत असल्याचे त्यांनी सभागृहात नमूद केले. या सर्व आरोपांची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

या आरोपांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो तो म्हणजे सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील उत्तरदायित्वाचा. लसींसारख्या संवेदनशील उत्पादनांच्या साठवणुकीपासून वाहतुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर निर्धारित मानके आणि 'कोल्ड चेन'चे काटेकोर पालन अपेक्षित असते. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी झाल्यास त्याचे परिणाम सार्वजनिक आरोग्यावर होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारच्या आरोपांकडे केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून पाहण्याऐवजी त्यांची वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

हाफकिनसारख्या ऐतिहासिक संस्थेची विश्वासार्हता ही केवळ तिच्या शतकभराच्या वारशावर टिकून राहत नाही; ती पारदर्शक प्रशासन, जबाबदार निर्णयप्रक्रिया आणि सार्वजनिक उत्तरदायित्वावरही अवलंबून असते. त्यामुळे संस्थेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाल्यास त्याचे निराकरण तथ्याधारित आणि स्वतंत्र चौकशीद्वारे होणे तितकेच महत्त्वाचे ठरते.

दरम्यान, विधानसभेत करण्यात आलेले आरोप हे संबंधित आमदारांनी मांडलेले दावे असून त्याबाबत अधिकृत चौकशीचे निष्कर्ष अद्याप समोर आलेले नाहीत. त्यामुळे आरोपांची सत्यता तपासणे ही संबंधित सक्षम यंत्रणांची जबाबदारी राहणार आहे. सरकारकडून किंवा हाफकिन प्रशासनाकडून या आरोपांवर काय भूमिका मांडली जाते आणि चौकशीबाबत कोणते निर्णय घेतले जातात, याकडे आता सार्वजनिक आरोग्य क्षेत्र, विधी तज्ज्ञ आणि सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या संस्थांबाबत विश्वास टिकवून ठेवण्यासाठी केवळ कार्यक्षमतेची नव्हे, तर पारदर्शकतेचीही तितकीच आवश्यकता असते. त्यामुळे हाफकिनवरील आरोपांचे सत्य वस्तुनिष्ठ चौकशीतून समोर येणे आणि दोषी आढळल्यास कायद्यानुसार कारवाई होणे, हे संस्थेची प्रतिष्ठा आणि नागरिकांचा विश्वास दोन्ही जपण्यासाठी तितकेच आवश्यक ठरणार आहे.

## संपादकीय

### आपण खरंच या इन्फ्रास्ट्रक्चरच्या जाळ्यात जगू शकतो का? की विकासच आपल्या जीवावर उठलाय?

एका विकसित राष्ट्राची ओळख त्याच्या उंच इमारतींनी, सर्वात लांब एक्सप्रेसवेने, सर्वात मोठ्या विमानतळाने किंवा सर्वात वेगवान मेट्रोने होत नाही. त्या देशाची खरी ओळख ठरते ती त्याच्या नागरिकांच्या सुरक्षिततेवर. कारण विकासाचा अर्थ फक्त बांधकाम नसतो; विकासाचा अर्थ विश्वास असतो. पण आज भारतात घडणाऱ्या घटनांकडे पाहिलं, तर मनात एक अस्वस्थ करणारा प्रश्न निर्माण होतोआपण विकासाचं राष्ट्र उभारत आहोत की अपघातांची वाट पाहणारं राष्ट्र?

३० ऑक्टोबर २०२२ रोजी गुजरातमधील मोरबी पूल कोसळला आणि शेकडो कुटुंबांचं आयुष्य एका क्षणात उद्ध्वस्त झालं. ४ जून २०२३ रोजी बिहारमधील अगुवानी–सुलतानगंज गंगा पुलाचा बांधकामाधीन भाग पुन्हा कोसळला. जून–जुलै २०२४ मध्ये बिहारमध्ये अनेक पूल कोसळल्याच्या घटना समोर आल्या. १५ जून २०२५ रोजी पुणे जिल्ह्यातील कुंडमळा पुलावरील दुर्घटना, ९ जुलै २०२५ रोजी गुजरातमधील गंभीरा पुलाचं कोसळणं, आणि आता जुलै २०२६ मध्ये मोशीतील दुर्घटना, पुणे–लोणावळा घाटातील दरडी आणि मावळमधील भूस्खलन. या प्रत्येक घटनेची कारणं वेगळी असू शकतात आणि काही प्रकरणांमध्ये चौकशी अजूनही सुरू आहे. पण एक गोष्ट समान आहेप्रत्येक वेळी जीव गमावणारा सामान्य नागरिकच असतो.

प्रत्येक दुर्घटनेनंतर आपण जवळजवळ एकच पटकथा पाहतो. घटना घडते. बचावकार्य सुरू होतं. चौकशीचे आदेश दिले जातात. नुकसानभरपाई जाहीर होते. काही अधिकाऱ्यांची बदली होते, काहींवर निलंबनाची कारवाई होते, काही दिवस माध्यमांमध्ये चर्चा होते आणि नंतर सगळं शांत होतं. पण काही महिन्यांनी दुसऱ्या राज्यात पुन्हा तशीच दुर्घटना घडते. मग प्रश्न असा पडतोआपण अपघातांची चौकशी करतो आहोत की अपघातांची पुनरावृत्ती स्वीकारली आहे?

आज भारत वेगवान आर्थिक प्रगतीचा दावा करतो. ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं स्वप्न दाखवलं जातं. स्मार्ट सिटी, बुलेट ट्रेन, एक्सप्रेसवे, मेट्रो, औद्योगिक कॉरिडॉर आणि मेगा प्रकल्पांचा अभिमान बाळगला जातो. पण विकासाची खरी परीक्षा उद्घाटनाच्या दिवशी नसते. ती पहिल्या मुसळधार पावसात होते. जर पहिल्याच मान्सूनमध्ये रस्ते उखडत असतील, पूल धोकादायक ठरत असतील, शहरं पाण्याखाली जात असतील आणि नागरिकांना स्वतःच्या जीवाची चिंता वाटत असेल, तर नागरिकांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे.

हवामान बदल हा आता भविष्यातील धोका राहिलेला नाही; तो वर्तमानातील वास्तव आहे. अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलन वाढत असल्याचं वैज्ञानिक सातत्याने सांगत आहेत. त्यामुळे प्रश्न असा नाही की पाऊस जास्त का पडतो. प्रश्न असा आहे की आपलं नियोजन अजूनही जुन्या गृहितकांवर का उभं आहे? हवामान बदलाचा विचार करून पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत का? नियमित सुरक्षा लेखापरीक्षण होतं का? दोष आढळल्यास त्यावर वेळेत कारवाई होते का?

याचा अर्थ असा नाही की भारतात झालेलं प्रत्येक बांधकाम निकृष्ट आहे. देशात अनेक उत्कृष्ट महामार्ग, मेट्रो, पूल आणि सार्वजनिक प्रकल्प यशस्वीपणे उभे आहेत. पण जिथे वारंवार दुर्घटना घडतात, तिथे त्या अपवाद म्हणून दुर्लक्षित करणं धोकादायक ठरू शकतं. अशा घटनांमधून शिकून प्रणाली सुधारली नाही, तर पुढची दुर्घटना ही फक्त वेळेचा प्रश्न राहते.

लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणं म्हणजे विकासाला विरोध करणं नाही. उलट, विकास अधिक सुरक्षित, अधिक पारदर्शक आणि अधिक उत्तरदायी व्हावा यासाठी प्रश्न विचारणं आवश्यक असतं. करदात्यांच्या पैशातून उभारलेल्या प्रत्येक पुलाचा, प्रत्येक रस्त्याचा आणि प्रत्येक सार्वजनिक इमारतीचा दर्जा विचारण्याचा अधिकार नागरिकांना आहे. सार्वजनिक प्रकल्पांचा स्वतंत्र सुरक्षा अहवाल लोकांसमोर का येऊ नये? नियमित तपासणी बंधनकारक का नसावी? जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक का नसावी? आज आपण स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहेआपल्याला जगातील सर्वात मोठं इन्फ्रास्ट्रक्चर हवं आहे, की जगातील सर्वात विश्वासार्ह इन्फ्रास्ट्रक्चर? कारण मोठं बांधणं अवघड असतं, पण सुरक्षित बांधणं त्याहून अवघड असतं. आणि सुरक्षिततेशिवाय विकास हा केवळ आकड्यांचा खेळ ठरतो.

शेवटी, विकास हा उद्घाटनांच्या फितींनी मोजला जात नाही; तो नागरिकांच्या विश्वासाने मोजला जातो. कारण इतिहासाला हे लक्षात राहत नाही की किती पूल बांधले गेले. इतिहासाला हे लक्षात राहतं की त्या पुलांवरून किती लोक सुरक्षितपणे आपल्या घरी पोहोचले. आणि जर प्रत्येक मान्सूननंतर भारतातील नागरिकांना हा प्रश्न पडत असेलआज आपण सुरक्षित घरी पोहोचू का?तर विकासाच्या मॉडेलकडे पुन्हा गंभीरपणे पाहण्याची वेळ निश्चितच आली आहे.

# मॅगझिन चौकात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे महापालिकेच्या वतीने उत्साहात स्वागत

### महापालिकेकडून वारकऱ्यांसाठी व्यापक सुविधा; प्रत्येक दिंडीला आरोग्य किटचे वितरण, दिंडी प्रमुख व वीणेकरांचा सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आळंदी येथून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आज सकाळी पिंपरी-चिंचवड नगरीत आगमन झाले,महापालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांनी त्यांच्या पालखीचे पुष्पहार अर्पण करून स्वागत केले.





यावेळी आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी,उपमहापौर शर्मिला बाबर,अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम,तृप्ती सांडभोर,महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे,नगरसदस्य निखिल बो-हाडे,सचिन तापकीर, जालिंदर शिंदे,सागर गवळी, नगरसदस्या योगिता नागरगोजे, सोनाली गव्हाणे,अर्चना सस्ते,कविता भोंगाळे,उप आयुक्त अण्णा बोदडे,डॉ.प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी परशुराम वाघमोडे,अजिंक्य येळे, डॉ.शिवाजी ढगे,डॉ.ऋतुजा लोखंडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

मॅगझिन चौक परिसरात ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या अखंड जयघोषाने, टाळ-मृदुंगाच्या निनादाने आणि विठ्ठलनामाच्या गजराने वातावरण भक्तिमय झाले. पालखी मार्गावर भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून माऊलींचे दर्शन घेतले. या मंगलमय वातावरणात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले.

यावेळी पालखीसोबत असलेल्या प्रत्येक दिंडीला महापालिकेतर्फे आरोग्य किट (प्रथमोपचार पेटी) चे वितरण करण्यात आले. तसेच दिंडी प्रमुखांचा, वीणेकरांचा देशी बियाणांचे पाकीट देऊन सत्कार करून वारकरी परंपरेतील त्यांच्या सेवेला कृतज्ञतापूर्वक गौरविण्यात आले.

मान्यवरांनी पालखी मार्गावरील विविध सुविधा व व्यवस्थेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी महापालिकेने आरोग्य तपासणी केंद्रे, रुग्णवाहिका सेवा, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता मोहीम, तात्पुरती स्वच्छतागृहे, मुक्कामाची सुविधा, प्रकाशयोजना, अग्निसुरक्षा, आपत्कालीन यंत्रणा तसेच वाहतूक व्यवस्थापनाचे व्यापक नियोजन केले आहे.

यावेळी आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी स्वतः ज्ञानोबा माऊली तुकाराम असा जयघोष टाळ-मृदुंग वादन केले आणि फेर देखील धरला.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजप नगरसदस्य - सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजपाच्या नगरसदस्यांची निवड झाली आहे. आता १३ जुलै रोजी या निवडणूक निकालाची औपचारिक घोषणा होईल, अशी माहिती महानगरपालिका सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिली.



प्रभाग समिती अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत आज दुपारी ३ ते सायंकाळी ५ ही होती. या काळात प्रत्येक प्रभागात १ याप्रमाणे भाजपकडून एकूण १० नगरसदस्यांनी अर्ज केले होते. तर राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना या दोन्ही पक्षाच्या एकाही नगरसदस्याने उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे सर्व प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजप नगरसदस्यांची निवड निश्चित झाली आहे.

यामध्ये प्रभाग अ (राजगड) समिती अध्यक्षपदी अर्चना करांडे यांची, प्रभाग ब (सिंहगड) समिती अध्यक्षपदी मंदार देशपांडे, प्रभाग क (विजयदुर्ग) समिती अध्यक्षपदी निखिल बोऱ्हाडे, प्रभाग ड (देवगिरी) समिती अध्यक्षपदी सविता खुळे, प्रभाग इ (शिवनेरी) समिती अध्यक्षपदी अर्चना सस्ते, प्रभाग फ (तोरणा) समिती अध्यक्षपदी शिवानी नरळे, प्रभाग ग (पुरंदर) समिती अध्यक्षपदी मनिषा पवार, प्रभाग ह (प्रतापगड) समिती अध्यक्षपदी तृप्ती कांबळे, प्रभाग ज (रायगड) समिती अध्यक्षपदी आरती चोंधे आणि प्रभाग ल (लोहगड) समिती अध्यक्षपदी रेखा देवकर यांची निवड निश्चित झाली आहे, असे देखील पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सांगितले.

## आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी शहराचा विभागनिहाय आराखडा तयार करणार : आयुक्त डॉ.सूर्यवंशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी चिंचवड शहरात उद्भवणाऱ्या पूरस्थितीसह कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी शहराच्या भौगोलिक रचनेचा, नैसर्गिक नाल्यांचा, पर्जन्यमानाचा तसेच वातावरणीय बदलांचा सखोल अभ्यास करून विभागनिहाय सर्वंकष आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली. तसेच नैसर्गिक नाल्यांचा प्रवाह अडविणारे अतिक्रमण अथवा अडथळे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर शहरात निर्माण झालेल्या पूर व पाणी साचण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस आमदार शंकर जगताप, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रम बगाडे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपायुक्त प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे युद्धपातळीवर बचावकार्य सुमारे १,५०० नागरिकांची बोटीच्या सहाय्याने सुटका; ५ हजार नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर, ७५० जनावरेही वाचविली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे विविध भागांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग नागरिकांच्या मदत व बचावकार्यासाठी अहोरात्र कार्यरत आहे. शहरातील विविध भागांमध्ये अडकलेल्या नागरिकांसह जनावरांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने हे बचावकार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यात आले.

अतिवृष्टीमुळे रहाटणी, केशवनगर, ताथवडे, किवळे, रावेत, मोशी, चिखली, रमाबाई नगर, भाट नगर, आंबेडकर नगर, नढे नगर, पिंपळे गुरव, नवी सांगवी, भोसरीतील कुंदननगर तसेच शहरातील अन्य पूरग्रस्त अशा सुमारे २० ते २५ भागांमध्ये नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. या ठिकाणी अग्निशमन विभागाच्या जवानांनी बोटींच्या सहाय्याने सुमारे १,५०० नागरिकांची सुखरूप सुटका करून त्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित केले.

याशिवाय, चिंचवड येथील केशवनगर परिसरातील गुरुकुलमध्ये अडकलेल्या तब्बल ३०० विद्यार्थ्यांचे यशस्वी बचावकार्य करून त्यांना सुरक्षित निवारा केंद्रात हलविण्यात आले. नदीकाठच्या मंदिरांमध्ये वाढत्या पाण्याच्या प्रवाहामुळे अडकलेल्या पुजाऱ्यांचीही सुखरूप सुटका करण्यात आली. ताथवडे परिसरात अडकलेल्या वयोवृद्ध नागरिकांना सुरक्षित बाहेर काढून निवारा केंद्रात हलविण्यात आले. काळेवाडी येथे गर्भवती महिला, लहान मुले तसेच अनेक वयोवृद्ध नागरिकांना सुरक्षितस्थळी पोहोचविण्यात आले, तर जुनी सांगवी परिसरात पूराच्या पाण्यात अडकलेल्या आई आणि तिच्या बाळाची धाडसीपणे सुखरूप सुटका करण्यात आली.

पूरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या एकूण सुमारे ५,००० नागरिकांना महानगरपालिकेच्या शाळांमध्ये उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यात आले असून, तेथे त्यांच्यासाठी भोजन, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा तसेच इतर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरिकांप्रमाणेच अतिवृष्टीमुळे पुरात अडकलेल्या गाई, म्हशी आदी सुमारे ७५० जनावरांनाही सुरक्षितपणे बाहेर काढण्यात अग्निशमन विभागाला यश आले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व १० अग्निशमन केंद्रांवरील अधिकारी, जवान आणि नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वय, तत्परता आणि धाडसाच्या बळावर ही आपत्कालीन परिस्थिती प्रभावीपणे हाताळली. या संपूर्ण बचाव मोहिमेत उप अग्निशमन अधिकारी अनिल टिंबळे, दिलीप गायकवाड, सुनील फरांदे, श्रीकांत वैरागर, गौतम इंगवले, चंद्रशेखर घुले यांच्यासह लिडिंग फायरमन अनिल कदम, वरिष्ठ फायरमन चेतन माने तसेच फायरमन सुमित कांबळे, शुभम किरवे, दर्शन सोनवणे, संतोष सरोटे, नामदेव वाघे, ड्रायव्हर-ऑपरेटर अमोल चिपळुनकर आणि इतर अग्निशमन जवानांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

## फ्लॅटमध्ये पेटवत होता चुल; आग लागून स्वत:च्या फ्लॅटबरोबरच इतरांचे साहित्य जळून खाक, अग्निशमन दलाने घरमालक आणि ७ पोपटांची केली सुखरुप सुटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** सोसायटीमधील लोकांनी सांगूनही तो आपल्या फ्लॅटमध्ये चुल पेटवत होता. त्यासाठी घरात लाकडाचा साठा करुन ठेवला होता. चुल पेटवल्यानंतर आगीचा भडका उडून त्यात फ्लॅटमध्ये आग लागली. त्यात त्याच्या फ्लॅटमधील सर्व साहित्य जळून खाक झालेच, पण, शेजारचे व वरच्या मजल्यावरील घराचे नुकसान झाले, इमारतीला तडे गेले आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांनी गॅलरीत अडकलेला घरमालक व त्याने पाळलेले ७ पोपट यांची सुटका केली.



याबाबत हेमा किरण गुजर (वय ४७, रा. राज टॉवर, मुंगळे अण्णानगर, धनकवडी) यांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी सुहास बबन गायकवाड (वय ४८, रा. राज टॉवर, मुंगळे अण्णानगर, धनकवडी) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना धनकवडीतील राज टॉवरमधील दुसऱ्या मजल्यावर बुधवारी ८ जुलै रोजी सकाळी ९ वाजता घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुहास गायकवाड हा रिक्षाचालक आहे. तो घरात एकटाच राहतो. त्याचा फ्लॅट दुसऱ्या मजल्यावर रुम नंबर ४८ आहे. तो घरात चुल पेटवतो. त्यासाठी घरात लाकूड फाटा साठवुन ठेवत होता. फियार्दी हेमा गुजर या त्याच्या शेजारील फ्लॅट नंबर ४७ मध्ये राहतात. त्याला सोसायटीतील अनेकांनी सांगितले, फ्लॅटमध्ये चूल पेटविणे चुकीचे आहे. तरीही त्याने कोणाचे ऐकले नाही. बुधवारी सकाळी त्याने नेहमीप्रमाणे घरात चुल पेटवली. चुल पेटवल्यानंतर काही कारणाने चुलीतील आगीचा भडका उडाला.

त्यातून घरात आग लागली. घरात लाकडे व पेट्रोल असल्याने आग भडकली. आग लागल्याचे दिसताच सुहास गायकवाड हा घरातून गॅलरीत गेले. घरातील आग भडकून घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले.

आगीच्या ज्वाला, धूर वरच्या मजल्यापर्यंत तसेच शेजारील फ्लॅटपर्यंत गेल्याने त्यांचे व सोसायटीचे ४ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाले. अग्निशमन दलाला याची खबर मिळाल्यावर जवानांनी शिडी लावून गॅलरीतील सुहास गायकवाड व त्यांच्या पाळलेल्या ७ पोपटांची सुखरुप सुटका केली. तोपर्यंत त्याच्या घरातील सर्व साहित्य जळून खाक झाले होते. आगीमध्ये शेजारच्या घराला तडे गेले. सहायक पोलीस निरीक्षक सोनाली मिठारे तपास करीत आहेत.अग्निशमन दलाचे केंद्र प्रमुख प्रदीप खेडेकर, अग्निशमन अधिकारी संतोष भिलारे, तांडेल भरत भारती, फायरमन अनिकेत पवार, प्रतिक शिर्के, अभिषेक खाटपे, शेखर येरफुले तसेच गंगाधाम अग्निशमन केंद्राचे तांडेल भरत वाडकर, फायरमन लक्ष्मीमन गवळी, रवी मदनावले, महेश घटमाळ, संकेत जाधव, केतन साठे यांनी ही कामगिरी केली आहे.

### जगताप नगरमध्ये पूरपरिस्थिती गंभीर

## पाण्याखालील डीपीमधून वीज घेतल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जगताप नगर :** पूरपरिस्थितीमुळे आधीच संकटात सापडलेल्या जगताप नगर भागात सुरक्षेचा एक मोठा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. सुरक्षा खबरदारी म्हणून संपूर्ण परिसरात वीज पुरवठा खंडित असताना, एका विशिष्ट घराला अनधिकृतपणे वीज पुरवठा सुरू ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.



यामुळे परिसरात जिवंत विद्युत प्रवाहाचा धोका निर्माण झाला असून स्थानिक रहिवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुसळधार पावसामुळे जगताप नगरमधील अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून सापांचा शिरकाव झाला आहे. जीवितहानी टाळण्यासाठी महावितरणने वीज बंद केली असताना, एका 'साहेबांनी' आपल्या प्रभावाचा वापर करून एका चांगल्या सोसायटीत असलेल्या डीपीमधून (ट्रान्सफॉर्मर) थेट स्वतःच्या घरासाठी वीज जोडणी घेतली.धक्कादायक बाब म्हणजे, ज्या डीपीमधून ही वीज घेण्यात आली आहे,

ती संपूर्ण सोसायटी सध्या पाण्याखाली आहे. पाण्याखालील डीपी सुरू ठेवल्यामुळे संपूर्ण परिसरात करंट उतरण्याचा आणि निष्पाप लोकांचा जीव जाण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. ''एका घराच्या विजेसाठी लोकांचे जीव धोक्यात घालणार का?'' असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. रहिवाशांनी प्रशासनाला धारेवर धरले असून, दोषींवर तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### रावेत-किवळे परिसरातील विकासाचा फुगा फुटला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रावेत :** पहिल्याच जोरदार पावसाने रावेत, किवळे, मामुर्डी, गहुंजे आणि विकासनगर परिसरातील पायाभूत सुविधांचा बोजवारा उडाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी शिरल्याने रहिवाशांचे मोठे नुकसान झाले, तर वीजपुरवठा खंडित आणि पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने हजारो नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.

या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी श्रीराम चौकात एकत्र येत महावितरण आणि पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत निषेध आंदोलन केले. लोकवस्ती झपाट्याने वाढत असतानाही स्वतंत्र वीज उपकेंद्र, सक्षम पावसाळी जलनिस्सारण व्यवस्था, दर्जेदार रस्ते आणि पुरेशा पाणीपुरवठ्यासाठी प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

बिल्डरांनी आकर्षक आश्वासने देऊन घरे विकली; मात्र प्रत्यक्षात नागरिकांना प्रत्येक पावसाळ्यात पाणी साचणे, अंधार, पाणीटंचाई आणि वाहतुकीच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा संताप व्यक्त करण्यात आला. परिसरात स्वतंत्र वीज केंद्र नसल्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत असल्याचेही आंदोलकांनी सांगितले.

आंदोलनादरम्यान रावेत पोलिसांनी नागरिकांना दमदाटी केल्याचा आरोपही करण्यात आला. शांततेत आंदोलन करणाऱ्या नागरिकांशी संवाद साधण्याऐवजी दबाव टाकण्यात आल्याने उपस्थितांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. समस्या मांडण्यासाठी जमलेल्या नागरिकांशी गुन्हेगारांसारखी वागणूक दिल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

दरम्यान, वीज आणि पाणी प्रश्नावर नागरिक रस्त्यावर उतरले असतानाही अनेक लोकप्रतिनिधी आंदोलनापासून दूर राहिल्याने उपस्थितांनी संताप व्यक्त केला. निवडणुकीत आश्वासनांचा वर्षाव करणारे नेते संकटाच्या काळात नागरिकांसोबत दिसत नसल्याची टीका करण्यात आली. परिसरासाठी स्वतंत्र वीज केंद्र उभारून मूलभूत सुविधांचा प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला.

# आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या भोजनाच्या गुणवत्तेची दिलीप वळसे पाटील यांच्याकडून पाहणी

## सेंट्रल किचनला भेट; स्वच्छता, अन्नसुरक्षा आणि वितरण व्यवस्थेचा घेतला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर,** आदिवासी विकास विभागाच्या सेंट्रल किचनला माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आज भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी तयार होणाऱ्या भोजनाच्या संपूर्ण प्रक्रियेची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी अन्न तयार करण्याची पद्धत, स्वच्छता, अन्नधान्याची गुणवत्ता, साठवणूक, पॅकिंग आणि वितरण व्यवस्थेची प्रत्यक्ष तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या सेंट्रल किचनमधून खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यातील विविध शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज सकस, पौष्टिक आणि दर्जेदार भोजन पुरविले जाते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून तयार होणाऱ्या भोजनात वापरण्यात येणारे तांदूळ, गहू, डाळी, भाजीपाला, मसाले, खाद्यतेल आणि इतर अन्नसाहित्याची गुणवत्ता, त्यांची साठवणूक तसेच वापराची पद्धत याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली.

भोजन तयार करताना अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या सर्व निकषांचे काटेकोर पालन होत आहे का, याचीही त्यांनी पाहणी केली. स्वयंपाकगृहातील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर, भोजन पॅकिंग प्रक्रिया, वेळेत वितरण आणि विद्यार्थ्यांपर्यंत गरम व ताजे अन्न पोहोचविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचाही त्यांनी आढावा घेतला.

यावेळी संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधताना दिलीप वळसे पाटील यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित, पौष्टिक आणि




गुणवत्तापूर्ण आहार उपलब्ध करून देणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असल्याचे सांगितले. भोजनाच्या गुणवत्तेबाबत किंवा स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी नियमित तपासणी, प्रभावी देखरेख आणि गुणवत्ता नियंत्रणाची यंत्रणा अधिक सक्षम ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या आरोग्यदायी भविष्यासाठी दर्जेदार भोजन व्यवस्था सातत्याने प्रभावी राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या भेटीमुळे सेंट्रल किचनमधील भोजन निर्मिती आणि वितरण व्यवस्थेचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## खडकवाडीत मुसळधार पावसाचा तडाखा; घरे पडली, पिकांचे मोठे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसासह गुरुवारी (दि. ९) पहाटे झालेल्या मुसळधार पावसामुळे आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी परिसरात मोठे नुकसान झाले आहे.

वरदरा येथील रामदास भागवत, सुभाष भागवत, वसंत भागवत तसेच खडकवाडी येथील दत्तात्रय सुक्रे यांची घरे कोसळली असून त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



याशिवाय खुडा वस्ती, वरदरा वस्ती आणि भैरवनाथ मंदिर परिसरातील शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने शेतपिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. पावसाच्या पाण्यामुळे अनेक शेतांतील उभी पिके बाधित झाली असून शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

नुकसानग्रस्त घरांचे तसेच पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाने योग्य ती आर्थिक मदत व भरपाई द्यावी, अशी मागणी माजी सरपंच अनिल डोके आणि परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

## लोणी-वाफगाव घाटात अतिवृष्टीमुळे झाडे उन्मळून पडली; मातीचा मलबा रस्त्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या भोजनाच्या गुणवत्तेची दिलीप वळसे पाटील यांच्याकडून पाहणी

सेंट्रल किचनला भेट; स्वच्छता, अन्नसुरक्षा आणि वितरण व्यवस्थेचा घेतला आढावा

स जनप्रवास प्रतिनिधी

मंचर : आदिवासी विकास विभागाच्या सेंट्रल किचनला माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आज भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी तयार होणाऱ्या भोजनाच्या संपूर्ण प्रक्रियेची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी अन्न तयार करण्याची पद्धत, स्वच्छता, अन्नधान्याची गुणवत्ता, साठवणूक, पॅकिंग आणि वितरण व्यवस्थेची प्रत्यक्ष तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या सेंट्रल किचनमधून खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यातील विविध शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज सकस, पौष्टिक आणि दर्जेदार भोजन पुरविले जाते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून तयार होणाऱ्या भोजनात वापरण्यात येणारे तांदूळ, गहू, डाळी, भाजीपाला, मसाले, खाद्यतेल आणि इतर अन्नसाहित्याची गुणवत्ता, त्यांची साठवणूक तसेच वापराची पद्धत याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली. भोजन तयार करताना अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या सर्व निकषांचे काटेकोर पालन होत आहे का, याचीही त्यांनी पाहणी केली. स्वयंपाकगृहातील स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर, भोजन पॅकिंग प्रक्रिया, वेळेत वितरण आणि विद्यार्थ्यांपर्यंत गरम व ताजे अन्न पोहोचविण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांचाही त्यांनी आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांशी

## विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल... || संत तुकाराम महाराजांची पालखी भक्तीमय वातावरण पुण्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : पुणे : जगद्गुरू संत तुकाराम महाराजांची पालखी पुण्यातील संचेती चौकात दाखल होताच परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. ज्ञानोबा माऊली तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल या जयघोषाने संचेती चौक आणि पालखी मार्ग दुमदुमून गेला.




संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी पुणे शहर सज्ज झाले असून, प्रमुख मार्गांवर भाविकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. वारकऱ्यांच्या मुखातून पांडुरंग पांडुरंग, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल असा नामघोष सुरू होता.

तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात, तर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात होणार आहे. दोन्ही ठिकाणी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. गर्दी नियंत्रण, दर्शन रांगा आणि वाहतूक व्यवस्थेसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने पालखी मार्गावरील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. भाविकांच्या स्वागतासाठी भव्य मंच उभारण्यात आले असून, पालखी मार्गावर विविध सामाजिक संदेश देणाऱ्या रांगोळ्यांनी आकर्षक पायघड्या घालण्यात आल्या आहेत. यंदाच्या पालखी सोहळ्याची प्रमुख जबाबदारी विश्वस्त विक्रमसिंह उमराज मोरे-देहूकर, उमेश सुरेश मोरे आणि लक्ष्मण दत्तात्रय मोरे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पालखी सोहळ्याचे नियोजन करण्यात येत आहे.

दरम्यान, राष्ट्रीय कला अकादमीच्या वतीने संचेती चौकात 'पोलिसांना सहकार्य करा' हा संदेश देणारी विशेष रांगोळी साकारण्यात आली. अकादमी मागील सात ते आठ वर्षांपासून पालखी सोहळ्यात सेवा म्हणून रांगोळीच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत आहे. पुण्यातील विविध रस्त्यांवरही नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी अशा संदेशात्मक रांगोळ्या तयार केल्या जात असल्याचे अकादमीच्या प्रतिनिधींनी सांगितले. जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले; तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा, या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळींप्रमाणे वारकरी परंपरेचा समतेचा आणि सेवाभावाचा संदेश पालखी सोहळ्यातून देण्यात येत आहे. पालखी सोहळ्यामुळे पुण्यात वारकरी, भाविक आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, प्रशासनाने नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आणि पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## शिक्षण व शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी आंबेगाव तालुका मुख्याध्यापक संघाचे तहसीलदारांना निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यासह राज्यातील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध प्रलंबित मागण्यांबाबत आंबेगाव तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या वतीने घोडेगाव येथील तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांना मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविण्यासाठी निवेदन देण्यात आले.



घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांना निवेदन देताना आंबेगाव तालुका मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी.

निवेदनामध्ये शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्यता, पदोन्नती प्रक्रिया, बीएलओ (इडज) कामकाजामुळे अध्यापनावर होणारा परिणाम तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्नांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी आंबेगाव तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील वळसे पाटील, कार्याध्यक्ष राजू आढळराव पाटील, उपाध्यक्ष नितीन बाणखेले, जिल्हा खजिनदार विनोद बोंबले, सचिव सचिन अनिल देसले तसेच आनंद कोकणे, प्रकाश चव्हाण आणि संघाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष सुनील वळसे पाटील यांनी संघटित प्रयत्नांतूनच शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांना न्याय मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्याध्यक्ष राजू आढळराव पाटील यांनी शिक्षकांचा सन्मान म्हणजे विद्यार्थ्यांचे हित असे प्रतिपादन केले. जिल्हा खजिनदार विनोद बोंबले यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण हाच आमचा संकल्प आहे, असे सांगितले.

तर उपाध्यक्ष नितीन बाणखेले यांनी शिक्षकांना अध्यापनाचे पवित्र कार्य पूर्णवेळ करता यावे, यासाठी त्यांच्यावरील बाह्य कामांचा भार कमी करण्याची गरज व्यक्त केली.

# राज्यातील विद्यापीठे 'दिव्यांग फ्रेंड'ली होणार कधी ? विद्यार्थ्यांना करावा लागतोय अडचणींचा सामना

■ पुणे : प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठासह राज्यभरातील बहुतांश उच्च शिक्षण संस्थांमधील अनेक इमारती, वाचनालये आणि वसतिगृहे आजही दिव्यांग फ्रेंडली नाहीत. प्रामुख्याने जवळपास ७० टक्के दिव्यांग विद्यार्थ्यांना या शिक्षणसंस्थांतील भौतिक सुविधा अन् डिजिटल सुलभतेसंदर्भात अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे.

दिव्यांग हक्क अभ्यासक निखिल उंडाळे यांनी संशोधन करून देशभरातील दिव्यांग विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचे वास्तव मांडले आहे. त्यांनी उच्च शिक्षण संस्थांमधील २०२ दिव्यांग विद्यार्थ्यांचा प्रातिनिधिक अभ्यास करून अनेक गंभीर बाबी मांडल्या



आहेत. या संशोधन अहवालानुसार जवळपास ७० टक्के विद्यार्थ्यांना भौतिक व डिजिटल सुलभतेसंदर्भात अडचणींचा सामना करावा लागतो. तब्बल ४७ टक्के विद्यार्थ्यांनी रॅम्प व लिफ्ट नसल्याची समस्या मांडली. तसेच ३५ टक्के विद्यार्थ्यांना वर्गखोल्यांमध्ये पोहोचण्यात अडचणी येतात. याचबरोबर ३३.७० टक्के विद्यार्थ्यांनी असुलभ स्वच्छतागृहांची समस्या मांडली.

> देशात दिव्यांगांसाठीच्या हक्कासंबंधीची धोरणात्मक चौकट मजबूत असली तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. उच्च शिक्षण संस्था आजही सर्व प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुलभ का नाहीत? समावेशक शिक्षण हे संपूर्ण व्यवस्थेची हमी न राहता काही निवडक संस्थांपुरतेच का मर्यादित आहे? दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुलभ, समावेशक आणि सन्मानपूर्वक उच्च शिक्षण व्यवस्था उभी करणे ही केवळ पायाभूत सुविधांची गरज नसून, समान संधी, मानवी प्रतिष्ठा आणि शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराची अंमलबजावणी आहे.
>
> **– निखिल उंडाळे, संशोधक व दिव्यांग हक्क अभ्यासक**

सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह बहुतांश उच्च शिक्षण संस्थांमधील प्रवेश सुरू आहेत. प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर दिव्यांग विद्यार्थ्यांचाही सहभाग लक्षणीय आहे. त्या दृष्टिकोनातून शिक्षण संस्थांमधील दिव्यांगास अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्याबाबत निराशाजनक स्थिती आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून मिळणारी ई-वाहन सेवा गेली अनेक वर्षांपासून बंद असल्याने दिव्यांगांसह सामान्य विद्यार्थ्यांनाही त्रासास सामोरे जावे लागत आहे.

याबाबत दिव्यांग सुरेश शर्मा म्हणाले की, विद्यापीठातील अनेक इमारती आजही दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे सुलभ नाहीत. विशेषतः दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांना ग्रंथालय वापरताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते, तर वसतिगृहांमध्ये मूलभूत सहाय्य सुविधांचा अभाव आहे. गेल्या काही वर्षांत निश्चितच विद्यापीठाने काही सकारात्मक पावले उचलली आहेत, पण जुन्या इमारती, डिजिटल सुविधा आणि संपूर्ण कॅम्पस अजूनही यूजीसी मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्वसमावेशक आणि सुलभ झालेला नाही.

> या अज्ञानाचे काय करायचे? जवळपास ८० टक्के विद्यार्थ्यांना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ आणि समसमान संधी कक्ष यांसारख्या यंत्रणांविषयी माहितीच नाही. निम्म्या विद्यार्थ्यांनी या अडथळ्यांमुळे स्वतःला शिक्षण व्यवस्थेतून वगळले गेल्याची भावना व्यक्त केली आहे. या घटनेचा त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत असल्याचेही नमूद केले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याचे किंवा तक्रार कुठे करावी हेच माहिती नसल्याचे सांगितले आहे. सर्वसामान्य महाविद्यालयात दिव्यांगांसाठी अडथळाविरहित वातावरणनिर्मिती नसल्याने आजही अनेक दिव्यांग विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांगांसाठीची स्वाधार योजना तसेच स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेसाठीची समिती कागदावरच आहे. राज्यातील सर्व महाविद्यालयांचे तसेच विद्यापीठाचे ॲक्सेस ऑडिट झाले पाहिजे.
>
> **– हरिदास शिंदे, समुपदेशक तथा दिव्यांग सक्षमीकरण कार्यकर्ते**

## सारांश वृत्त

### एक्सपायरी डेट उलटून गेलेले न्यूडल्स खाल्ल्यानंतर मुलगी आजारी पडली; ग्राहक मंचाची रिलायन्स रिटेलवर कारवाई, मिळाली 'इतकी' भरपाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** ग्राहक किराणा दुकानातून प्रत्येक वस्तूवरील 'एक्सपायरी डेट' तपासणार नाही, हे सांगत हिमाचल प्रदेशच्या ग्राहक आयोगाने रिलायन्स रिटेलला दणका दिला आहे. एक्सपायरी डेट उलटून गेलेले न्यूडल्स खाल्ल्यामुळे एक अल्पवयीन मुलगी आजारी पडल्यानंतर ग्राहक आयोगाने दुकानाला दंड ठोठावला.

एक्सपायरी डेट उलटून गेलेले पदार्थ दुकानात ठेवणे ही दुकानदाराची अक्षम्य चूक आहे. यामुळे ग्राहक आयोगाने संबंधित ग्राहकाला सदर वस्तूचे पैसे, नुकसान भरपाई म्हणून २०,००० रुपये आणि झालेला कायदेशीर खर्च परत करण्यास सांगितले. एक्सपायरी उलटून गेलेले स्पायसी कोरियन इन्स्टंट न्यूडल्स विक्री केल्याबद्दल हिमाचल प्रदेशच्या कांगडा जिल्ह्यातील जुगल किशोर यांनी रिलायन्स स्मार्ट पॉईंट या दुकानाविरोधात जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगात धाव घेतली होती. आयोगाचे अध्यक्ष हिमांशू मिश्रा, सदस्य आरती सूद आणि नारायण ठाकूर यांनी या प्रकरणाची सुनावणी घेतली. एक्सपायरी डेट उलटून गेलेला कोणताही पदार्थ दुकानातील शेल्फमध्ये न ठेवणे किंवा त्याची ग्राहकांना विक्री होऊ न देणे हे सर्वतोपरी दुकानदाराचे न टाळता येणारे काम आहे. ग्राहकाने दैनंदिन पदार्थ विकत घेत असताना सर्व पदार्थ वर-खाली, आलटून-पालटून पाहून त्याच्यावरील एक्सपायरी डेट पाहणे अपेक्षित नाही, अशी टिप्पणी ग्राहक विवाद निवारण आयोगाने ६ जुलै रोजी दिली.

# मुलीनेच जन्मदात्या आईची केली हत्या, सात लाखांची सुपारी देऊन अपघात घडवला; समोर आलं धक्कादायक कारण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर :** जयपूरमधील प्रताप नगर भागात ३ जुलै रोजी घडलेल्या एक धक्कादायक घटना घडली आहे. न्यायालयीन लिपिक असलेल्या ४५ वर्षीय नीरज शर्मा यांची कारने चिरडून हत्या करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणी नीरज यांची मुलगी आयुषी शर्मा हिच्यासह सात जणांना अटक केली असून, एक आरोपी अजूनही फरार आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

**अपघात नव्हे, पूर्वनियोजित कट**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नीरज शर्मा या आपल्या मुलाला कोचिंग क्लासमध्ये सोडून घरी परतत असताना सुमारे १३० किमी प्रतितास वेगाने येणाऱ्या एका स्कॉर्पिओ कारने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेमुळे त्या १०० फूट दूर फेकल्या गेल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर चालक गाडीसह पळून गेला. मात्र, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर हा अपघात नसून पूर्वनियोजित खून असल्याचा संशय पोलिसांना आला. तपासादरम्यान कौटुंबिक कट आणि भाडोत्री मारेकऱ्यांचा सहभाग उघडकीस आला.

**हत्येमागचं कारण काय?**





डीसीपी रंजिता शर्मा यांनी सांगितलं की, नीरज यांच्या पतीचं सुमारे एका वर्षापूर्वी निधन झालं. पतीच्या निधनानंतर नीरज यांना अनुकंपा तत्त्वावर न्यायालयात कनिष्ठ लिपिक (ड्रुउ) म्हणून नोकरी मिळाली. मुलगी आयुषीला स्वतःला ती सरकारी नोकरी हवी होती, मात्र नीरज यांनी स्वतः ती नोकरी स्वीकारली. याशिवाय, गेल्या २-३ वर्षांपासून आई आणि मुलीमध्ये मालमत्तेवरूनही वाद सुरू होता.

**७ लाखांची दिली सुपारी**

नोकरी आणि मालमत्ता हस्तगत करण्यासाठी आयुषीने तिचे काका मोहन स्वरूप आणि चुलत भाऊ बलराम उर्फ रवी यांच्यासोबत मिळून आईला संपवण्याचा कट रचला. यासाठी त्यांनी भरतपूर येथील हेमंत शर्मा याला ७ लाख रुपयांची सुपारी दिली. आरोपींनी सुरुवातीला भाड्याने घेतलेल्या थार गाडीतून नीरज यांची रेकी केली, पण तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. त्यानंतर महिनाभर पाळत ठेवून अखेर स्कॉर्पिओ कारने हा हल्ला करण्यात आला.

३ जुलै रोजी आरोपी हेमंत शर्मा नीरज यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून होता. रोहित जाटव दुचाकीसह जवळच थांबला होता. आकाश शर्मा स्कॉर्पिओ चालवत होता, तर अरविंद शर्मा त्याच्यासोबत गाडीत बसला होता. नीरज यांना धडक दिल्यानंतर आरोपींनी स्कॉर्पिओ तिथेच सोडली आणि दुचाकीवरून पळ काढला. नीरज यांचे भाऊ राकेश कुमार शर्मा यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. नीरज यांनी यापूर्वीच मुलगी, सासरचे लोक आणि चुलत भावाकडून मालमत्तेसाठी त्रास दिला जात असल्याची आणि जिवे मारण्याच्या धमक्या येत असल्याची तक्रार केली होती, असं पोलिसांनी सांगितलं.

पोलिसांनी आयुषी शर्मा, मोहन स्वरूप, मोहित शर्मा, आकाश शर्मा, अरविंद शर्मा, हेमंत शर्मा आणि रोहित जाटव यांना अटक केली आहे. तर या कटातील मुख्य सूत्रधार मानला जाणारा बलराम उर्फ रवी सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## ठाण्यात डॉक्टरला मारहाण प्रकरण; 'राजीनामा दिला, आता परत जाणार नाही' : पीडित डॉक्टरची व्यथा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई/ठाणे :** ठाण्यातील एका रुग्णालयात शिवसेनेच्या (शिंदे गट) नगरसेवकाकडून झालेल्या कथित मारहाणीच्या घटनेनंतर पीडित निवासी वैद्यकीय अधिकारी (ठ्वज) यांनी नोकरीचा राजीनामा दिला असून, मी पुन्हा त्या रुग्णालयात जाणार नाही. माझ्या सुरक्षिततेची भीती वाटते, अशी भावना व्यक्त केली आहे.

द इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीत डॉक्टरांनी सांगितले की, घटनेच्या वेळी ते ड्युटीवर असलेले एकमेव पुरुष डॉक्टर होते. त्यामुळे जमावाचा रोष त्यांच्यावरच निघाला. मी कोणाशी वाद घातला नव्हता, तरीही मला लक्ष्य करण्यात आले, असे त्यांनी म्हटले.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, मारहाणीनंतर त्यांना मानसिक धक्का बसला असून, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण नसल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. या घटनेनंतर डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वैद्यकीय संघटनांनी या प्रकाराचा निषेध करत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. घटनेनंतर संबंधित नगरसेवकाविरोधात राजकीय आणि सामाजिक स्तरावरही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

## तृणमूल काँग्रेसच्या गोठवलेल्या बँक खात्यांना आंशिक दिलासा; कोलकाता उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस (टीएमसी)च्या सुमारे ४४० कोटी रुपयांच्या गोठवलेल्या बँक खात्यांवरील निर्बंधांमध्ये कोलकाता उच्च न्यायालयाने आंशिक शिथिलता दिली आहे. न्यायालयाच्या आदेशामुळे पक्षाला ठरावीक अटींवर काही खात्यांतील निधी वापरण्याची मुभा मिळाली आहे.

द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईनंतर टीएमसीशी संबंधित काही बँक खाती गोठवण्यात आली होती. या कारवाईविरोधात पक्षाने उच्च न्यायालयात धाव घेत, नियमित पक्षकारभार, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि दैनंदिन प्रशासकीय खर्चावर त्याचा परिणाम होत असल्याचा युक्तिवाद केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर उच्च न्यायालयाने खात्यांवरील संपूर्ण निर्बंध कायम ठेवण्याऐवजी मर्यादित स्वरूपात निधी वापरण्याची परवानगी दिली. मात्र, या परवानगीस काही अटी घालण्यात आल्या असून निधीचा वापर न्यायालयाच्या निर्देशांनुसार करावा लागणार आहे.

या प्रकरणात तपास यंत्रणांचा तपास सुरू असून, खात्यांतील निधीचा स्रोत आणि संबंधित आर्थिक व्यवहारांची चौकशी अद्याप सुरू आहे. त्यामुळे न्यायालयाने दिलेला दिलासा हा अंतिम निकाल नसून, प्रकरणाच्या पुढील सुनावणीवर त्याचा अंतिम परिणाम अवलंबून राहणार आहे.

दरम्यान, या आदेशाकडे राजकीय आणि कायदेशीर वर्तुळाचे लक्ष लागले असून, आर्थिक तपास आणि राजकीय पक्षांच्या निधी व्यवस्थापनासंदर्भातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# लॉरेन्स बिश्नोई टोळीवर आंतरराष्ट्रीय विळखा; कॅनडाच्या तपासापासून FBIच्या 'ऑपरेशन हार्ड बॉल'पर्यंत कारवायांची मालिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** भारतातील कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई आणि त्याच्या गुन्हेगारी जाळ्याविरोधातील तपासाला आता आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. कॅनडातील तपास यंत्रणांची चौकशी, अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (ऋइख)चे 'ऑपरेशन हार्ड बॉल' आणि विविध देशांतील तपास संस्थांमधील समन्वयामुळे बिश्नोई टोळीवरील दबाव वाढत असल्याचे चित्र आहे.

द इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, गेल्या काही वर्षांत बिश्नोई टोळीवर खंडणी, संघटित गुन्हेगारी, आंतरराष्ट्रीय शस्त्रसाखळी आणि सीमापार गुन्हेगारी कारवायांशी संबंधित आरोपांमुळे विविध देशांतील तपास यंत्रणांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

कॅनडामध्ये खलिस्तानी नेते हरदीपसिंह निज्जर यांच्या हत्येनंतर संघटित गुन्हेगारी आणि परदेशातील भारतीय वंशाच्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या धमक्यांच्या अनुषंगाने बिश्नोई टोळीचाही तपासाच्या कक्षेत समावेश करण्यात आला.



त्यानंतर अमेरिकन तपास यंत्रणांनीही संघटित गुन्हेगारीशी संबंधित आर्थिक व्यवहार, शस्त्रपुरवठा आणि आंतरराष्ट्रीय संपर्कांचा मागोवा घेण्यास सुरुवात केली.

'ऑपरेशन हार्ड बॉल' या ऋइखच्या कारवाईत संघटित गुन्हेगारी नेटवर्क, आर्थिक व्यवहार आणि सीमापार गुन्हेगारी साखळ्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. या कारवाईत बिश्नोई टोळीशी संबंधित काही व्यक्तींच्या हालचाली आणि आर्थिक व्यवहारांचाही तपास होत असल्याचे सांगितले जाते.

सध्या लॉरेन्स बिश्नोई भारतात विविध गुन्ह्यांप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असून, त्याच्याविरोधात अनेक राज्यांमध्ये खून, खंडणी, धमक्या आणि संघटित गुन्हेगारीचे गुन्हे दाखल आहेत. तपास यंत्रणा त्याच्या देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय संपर्कांचा शोध घेत आहेत.

## आलिशान हॉटेलांना तीन दशकांपासून गंडा; 'चेक-आऊट'च न करणाऱ्या पाहुण्याची थक्क करणारी कहाणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** : देशभरातील अनेक आलिशान हॉटेलांमध्ये बनावट ओळख, खोटे आश्वासने आणि फसव्या पद्धतींचा वापर करून तब्बल ३० वर्षे मोफत मुक्काम करणाऱ्या एका व्यक्तीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अखेर पोलिसांनी त्याला अटक केली असून त्याच्या फसवणुकीची व्याप्ती पाहून तपास यंत्रणाही चक्रावल्या आहेत.

आरोपी विविध शहरांतील पंचतारांकित आणि नामांकित हॉटेलांमध्ये स्वतःला उद्योगपती, सरकारी अधिकारी किंवा प्रभावशाली व्यक्ती म्हणून सादर करत असे. विश्वास संपादन केल्यानंतर तो अनेक दिवस हॉटेलमध्ये राहत असे. बिल भरण्याची वेळ आल्यावर खोटे बहाणे, बनावट कागदपत्रे किंवा आर्थिक व्यवहाराचे आश्वासन देऊन तो हॉटेल व्यवस्थापनाची दिशाभूल करत असे. अनेकदा तो बिल न भरताच पसार होत असे. प्राथमिक तपासात गेल्या तीन दशकांत त्याने अशाच प्रकारे अनेक हॉटेलांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. त्याच्याविरोधात विविध राज्यांमध्ये फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, त्याने कोणकोणत्या हॉटेलांना गंडा घातला आणि एकूण किती रकमेची फसवणूक केली.

## '८४ कोटींच्या जमिनीवर चाऱ्याचा प्रश्न'; मंदिर परिसरातील जमीन व्यवहारावरून नवा राजकीय संघर्ष, निष्पक्ष चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मंदिर परिसराशी संबंधित कोट्यवधी रुपयांच्या जमीन खरेदीवरून राजकीय वादाला नवे वळण मिळाले आहे. एका व्हायरल व्हिडिओतील वक्तव्यानंतर या जमीन व्यवहाराच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून, कथित गैरव्यवहाराची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी किंवा चौकशीचे निष्कर्ष अद्याप समोर आलेले नाहीत.

व्हिडिओतील दाव्यानुसार, मंदिर परिसरापासून सुमारे ८ किलोमीटर अंतरावर ८४ कोटी रुपयांची जमीन खरेदी करण्यात आली. एवढ्या मोठ्या रकमेची जमीन खरेदी करूनही त्या ठिकाणी अपेक्षित विकासकामे किंवा बांधकामे का झालेली नाहीत, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. संबंधित जमिनीचा सध्याचा वापर शेतीसाठी होत असून, तेथे जनावरांसाठी चारा पिकवला जात असल्याचा दावा करण्यात आला आहे.

याच मुद्द्यावरून विरोधकांवर टीका करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'चारा चोरी'च्या आरोपांचा संदर्भ देत राजकीय पलटवार करण्यात आला आहे.

# समलैंगिक जोडप्याने भेट दिलेल्या ब्रासलेटचा वाद पोहोचला उच्च न्यायालयात; भेटवस्तू की उत्पन्न हा वाद चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काळा पैसा पांढरा करणे आणि कर चुकवेगिरी रोखण्यासाठी सरकारने आयकर कायदा, १९६१ मध्ये कलम ५६(२) (एक्स) आणले होते. या कलमानुसार जर एखाद्या व्यक्तीला ५०,००० रुपयांहून अधिकच्या किमतीची भेट वस्तू किंवा रोख रक्कम मिळाल्यास त्यावर कर लावला जातो. या कलमाला काही अपवादही आहेत. जसे की, नातेवाईक आणि कुटुंबातील व्यक्तीने दिलेल्या भेटवस्तू कर मुक्त असतात. यावरूनच सध्या कर्नाटक उच्च न्यायालयात एक वाद सुरू आहे. समलैंगिक जोडप्याने दिलेले सोन्याचे ब्रासलेट ही भेटवस्तू नसून उत्पन्न आहे, असा दावा केला गेला. यानंतर या समलैंगिक जोडप्याने कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका करून आयकर कायद्यातील 'जोडीदार' या शब्दाचा आधार घेतला आहे.

आयआयटीचे माजी विद्यार्थी असलेल्या अनुराग कालिया आणि अखिलेश गोदी यांनी आयकर कायद्याच्या कलम ५६(२) (एक्स) च्या पाचव्या तरतुदीच्या घटनात्मक वैधतेला कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. यानंतर कर्नाटक उच्च न्यायालयाने या याचिकेबद्दल मंगळवारी केंद्र सरकारचा अभिप्राय मागितला. या तरतुदीनुसार, वैवाहिक जोडप्याने एकमेकांना दिलेल्या भेटवस्तू करामधून मुक्त आहेत. पण या तरतुदीचा शब्दशः अर्थ घेतला असून समलैंगिक जोडप्याला यातून वगळले जात आहे, असे याचिकेत म्हटले आहे.

**प्रकरण काय आहे?**

अखिलेश गोदी यांना १४.४१ ग्रॅमचे २२ कॅरेटचे सोन्याचे ब्रासलेट त्यांच्या वडिलांकडून मिळाले होते. हे ब्रासलेट त्यांनी कालिया यांना भेट म्हणून दिले. या ब्रासलेटची किंमत १ लाख १५,५०० असल्याचे जोडप्याने सांगितले.



कलम ५६(२) (एक्स) नुसार, जर एखाद्याकडून ५०,००० हून अधिक किमतीच्या वस्तू किंवा थेट रोख रक्कम मिळाली, तर ती कर पात्र उत्पन्न म्हणून ग्राह्य धरली जाईल. या कलमाला काही अपवादही आहेत. पती, पत्नी, भाऊ, बहीण, आई-वडील किंवा कुटुंबातील इतर नातेवाईकांनी दिलेल्या भेटवस्तूंवर मात्र कर लागत नाही.

**जोडप्याचा मुद्दा काय?**

जर दोन पुरूषांनी लग्न केले आहे किंवा भिन्न लिंगी जोडपे लग्नाशिवाय जर बराच काळ एकमेकांसह राहत असतील तर अशावेळी संबंधितांनी दिलेल्या भेट वस्तू या कर पात्र ठरविल्या जाऊ नयेत किंवा त्यांची कर विवरण पत्रात माहिती देण्याची आवश्यकता नाही, असे जोडप्याने याचिकेत म्हटले आहे.

याचिकेत दिलेल्या माहितीनुसार, २०२५-२६ या वर्षाचे कर विवरणपत्र तयार करताना त्यांना ब्रासलेटच्या बाजारभावानुसार कर भरण्याचा सल्ला दिला गेला. या ब्रासलेटच्या बाजारभावानुसार २५ टक्के कर, १५ टक्के अधिभार आणि ४ टक्के उपकर भरण्यास सांगितले गेले.

जोडप्याने याचिकेत म्हटले की, ते दोघेही सॉफ्टवेअर इंजिनिअर असून सात वर्षांहून अधिक काळ बंगळुरूत एकत्र राहत आहेत. दोघांच्या नावावर बंगळुरूत एकच घर आहे. त्यामुळे ते लग्नाप्रमाणेच एकमेकांचे जोडीदार आहेत.